शनिवार दि.८ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## लोकसभेतील घवघवीत यशानंतर काँग्रेसचे वजन वाढले

# विधानसभेत १५० जागा लढवणार-नाना पटोले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभेतील मोठ्या विजयानंतर काँग्रेसने विधानसभेची तयारी केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मोठी घोषणा केली आहे. आगामी विधानसभेत काँग्रेस पक्ष १५० जागा लढवणार असे ते म्हणालेत. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे सहाजिकच काँग्रेसचे वजन वाढले आहे. त्यामुळे विधानसभेसाठी काँग्रेसकडून जास्त जागांचा दावा केला जाऊ शकतो असे बोलले जात आहे.

नाना पटोले यांनी पुढे म्हटले आहे की, ''लोकसभेनंतर आता विधानसभेची तयारी करावी लागेल. आगामी विधानसभेत काँग्रेस पक्ष १५० जागा लढवण्याच्या विचारात आहे. लोकसभेत जागा वाटपाचा फॉर्म्युला तयार करण्यासाठी साडे तीन महिने गेले. विधानसभेत हे टाळावे लागेल. त्यासाठी महिन्याभरात जागा वाटपाचा फॉर्म्युला तयार करावा लागेल. म्हणूनच आत्तापासूनच तयारी करावी लागेल'', असे नाना पटोले म्हणाले.विशाल पाटीलही आमच्यासोबत येतील तसेच सांगलीचे अपक्ष उमेदवार विशाल पाटीलही आमच्यासोबत येतील असा मोठा दावाही त्यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा मोठा फायदा झाला. या यात्रेमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनाही बळ मिळाले. आम्ही हाच उत्साह घेऊन विधानसभेच्या मैदानात उतरू'', असे नाना पटोले म्हणाले.तसेच यंदाच्या निवडणुकीत वंचितचा प्रभाव नव्हता असेही नाना पटोले म्हणाले. शिवाय मराठा आरक्षणाचा परिणामही निवडणुकीवर झाल्याची चर्चा आहे. यावरही त्यांनी भाष्य केले आहे. ''लोकसभेच्या निवडणुकीत मराठा आरक्षण तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा प्रभाव नव्हता. तसेच वंचितचे प्रकाश आंबेडकर यांचाही फारसा प्रभाव जाणवला नाही. गेल्या निवडणुकीत आम्ही वंचितमुळे ९ जागा हरलो होतो. मात्र या निवडणुकीत त्याचा कोणताही परिणाम झाला नाही'', असे नाना पटोले म्हणाले.



# एकाच कुटुंबातील सख्ये बहिण भाऊ वैद्यकीय क्षेत्रास पात्र

## नीट परिक्षेत गुणवंत होऊन,आई-वडिलांचे,कुटूंबाचे स्वप्न पूर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालूका म्हणजे मन्याड खोर्यातील डोंगर-दऱ्याचा तालूका म्हणून ओळखतो,याच तालुक्यातील मुंडेवाडी येथील रहिवासी असलेल्या मुंडे कुटुंबातील सख्या बहिण भावाने निट परीक्षा-२०२४ मध्ये भरघोस गुण घेऊन केले,गावांचे,कुटुंबाचे व आई-वडिलांचे स्वप्न केले साकार!

याबाबत सविस्तर माहिती अशी कि कंधार तालुक्यातील डोंगराच्या उतरतीला असलेले अन् गुणवंताची खाण असणारे गाव म्हणजे मुंडेवाडी या छोट्याशा वस्तीमध्ये जन्म झालेल्या माधवराव मुंडे यांचा नातू व मारोती माधवराव मुंडे यांचा मुलगा संदीप मारोती मुंडे या चिमुकल्याने नुकताच निकाल लागलेल्या वैद्यकीय चाचणी परीक्षा (निट) परीक्षेत २०२४ च्या ७२० पैकी ६९० गुण मिळवून वैद्यकीय प्रवेशास पात्र झाला आहे. तसेच त्यांची सुकन्या ऋतुजा मुंडे हिने ७२० पैकी ५८५ गुण मिळवत प्रवेशपात्र झाली.मुंडे कुटुंबातील सख्ये बहिण भाऊ एमबीबीएस साठी पात्र ठरलेत आहेत, कु.ऋतुजा ही वक्तृत्व कलेत निपुण आहे.ती आठव्या वर्गात असतांना शालेय स्तरावर आपल्या गुणांचा ठसा उमटविला. डॉ.केशवरावजी धोंडगे यांनी तिचे कौतुक केले होते.आई-वडिलांसह सर्व कुटुंबाचे नावलौकिक वाढविला आहे.संदिप व ऋतुजा या भावंडावर सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होतो आहे,

सर्वसाधारण कुटुंबात जन्माला आलेल्या व कुठल्याही वैद्यकीय वारसा नसलेल्या संदीप व ऋतुजा यांनी आपल्या आई-वडील व गुरुंच्या मार्गदर्शना खाली अहोरात्र,जिद्दीने मेहनत घेत नेट परीक्षेत घवघवीत यश मिळविले.



**संदीप मारोती मुंडे**
**७२० पैकी ६९०**



**ऋतुजा मारोती मुंडे**
**७२० पैकी ५८५**

## जिजाऊ ब्रिगेडची भोकरदन तालुका कार्यकारिणी जाहीर

# अध्यक्षपदी सौ.हेमा बापूराव जाधव तर सचिवपदी सौ. वैशाली अमोल शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेख जफर । भोकरदन**

महाराष्ट्र हा आठरापगड जातीचा राज्य म्हणून ओळखलं जातं.गेल्या अनेक दिवसापासून जिजाऊ ब्रिगेड संपूर्ण राज्यात अतिशय जोमाने काम करत आहे. जिजाऊ ब्रिगेडच्या जालना जिल्हाध्यक्ष शिवमती सिमा विश्वनाथ काकडे यांनी आज शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून जिल्हा,तालुका,शहर कार्यकारिणी जिजाऊ ब्रिगेडची गठीत करण्यात आली असून जालना जिल्हा उपाध्यक्षपदी सुप्रिया देशमुख यांची निवड करण्यात आली आसून ह्या उच्च शिक्षित असून,त्या एका आदर्श शिक्षिका असून त्याच्या हातून ज्ञानदानाचा कार्य नेहमी होतं असते. त्याच्या हातून संघटनेचे संघटन वाढवे ही नियुक्ती करण्यात आली आसुन तसेच भोकरदन तालुक्यात गेल्या अनेक दिवसापासून सौ हेमा बापूराव जाधव व सौ.वैशाली अमोल शिंदे ह्या जिजाऊ ब्रिगेड मध्ये सक्रिय काम करत होत्या.त्याच्या मध्ये असलेले संघटन कौशल्य तसेच नेतृत्व करण्याच गुण लक्षात घेऊन त्याच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत भोकरदन तालुका जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षपदी सौ हेमा बापूराव जाधव यांची तर सचिवपदी सौ.वैशाली अमोल शिंदे नियुक्ती करण्यात आली आहे.







## शेख शकीलाबी यांचा शॉक लागून मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



दानापूर भोकरदन तालुक्यातील दानापुर येथील ग्रामपंचायत सरपंच शकीलाबी मोबिन शेख वय ४९ यांचे दी.७ जुन रोजी सकाळी ०७:०० वाजे दरम्यान विजेचा शॉक लागून फरशीवर अदळून मृत्यू झाला .त्यांचा दफन विधीचा कार्यक्रम दानापूर येथे दि.०७ रोजी दुपारी ०२:३० वाजता मुस्लिम प्रथे नुसार दफनविधी करण्यात आली. गावात हळहळ व्यक्त करण्यात आले व पंचकृषितील आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक शिक्षक वर्ग, पत्रकार बंधू, सहित मोठया संखेत दफन विधी साठी पुरुष महिला उपस्थित होते.त्यांचा पच्छात पती,सासू,दोन मूले,एक मुलगी,सुना, नातू पंतू असा मोठा परिवार आहे.

## चारोळी

रांगोळीत मनासारखे
रंग ती भरत जाते
नऊ रसाचा रंग वेगळा
नवीन पान उलटून पाहते.

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

# दुष्काळ जाहीर करुनही २०२३ चा खरीप पिकविमा मिळाला नाही, पिक कर्ज माफ केले नाही तसेच पिककर्जाचे पुर्नरगठनही केले नाही

## शेतकरी-२०२४ च्या खरीपाची पेरणी कशी करणार-भाई विष्णुपंत घोलप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

सन- २०२३ च्या खरीप हंगामात पावसाच्या खंडामुळे खरीप पिके जवळपास ८०% वाया गेली. शासनाने त्यावेळेस दुष्काळ जाहीर केला जी काही पिके आली ती काढणी आणि पेरणीला सुध्दा पुरली नाहीत. आज पावसाळ्याला सुरुवात झाली असुन शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतकऱ्यांचा गेल्यावर्षीचा म्हणजे सन-२०२३ चा खरीप पिकविमा किमान ८०% तरी शेतकऱ्यांना तात्काळ मिळाला पाहिजे तसेच पिक कर्जाचे नवे जुने करुन शेतकऱ्यांच्या पदरात काही सुध्दा पडत नाही. १०% पिक कर्ज वाढुन म्हणजे बँकेला व्याजाची भरती करण्यासाठी मार्ग काढला आहे. मा. जिल्हाधिकारी साहेबांनी शेतकऱ्यांना तात्काळ नवीन पिक कर्ज वाटप करण्यासाठी बँकांना आदेश द्यावेत आणि विमा कंपनीला सुचना देऊन २०२३ चा खरीप पिक विमा किमान सन-२०२४ च्या खरीप पेरणीसाठी तरी तात्काळ द्यावा. नसता शेतकऱ्यांचा मोठा उद्रेक होईल, शेतकरी खुप मोठ्या आर्थिक संकटात असल्यामुळे त्याला तात्काळ खरीप पेरणीसाठी मागील पिकविमा आणि नवीन पिक कर्ज कोणताही विलंब न करता तात्काळ मिळावे. या अगोदर भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री मुंडे साहेब आणि जिल्हाधिकारी, बीड यांना लेखी निवेदनाव्दारे वरील मागणी केलेली आहे. लोकसभा निवडणुकीमुळे वरील विषयाला जरी विलंब झाला असेल तरी आता केंद्रीय निवडणुक आयोगाने आचारसंहिता उठविली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री आपल्या बीड जिल्ह्यातील असल्यामुळे वरील विषयाला गंभीरतेने घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक संकटातुन बाहेर काढण्याचा मार्ग मोकळा करावा असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा यांच्या मार्फत मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड तसेच माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब व भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग(बप्पा)सोनवणे यांना दिले आहे.





**दैनिक लोकनेताचे पाटोदा तालुका प्रतिनिधी तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे सोशल मिडिया अध्यक्ष पत्रकार शेख महेशर यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा देतांना. पाटोदा तालुका पत्रकार संघाचे प्रेस फोटोग्राफर संघ अध्यक्ष श्री.सखाराम भोसले.(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

## बावी येथील पुलावर पाणी साचल्या मुळे येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशाचे हाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

डोईठाण महामार्गावर बावी येथे पुलावर पाणी साचल्यामुळे येणाऱ्या- जाणाऱ्या प्रवाशाचे हाल होत आहेत व नागरिकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर ते पुलाचे काम करावे. एका पुलाचे काम पूर्ण झाले आहे व एका पुलाचे काम बाकी आहे, अर्ध्या रस्त्याचे काम झाले आहे तर अर्धे काम बाकी आहे. त्यामुळे प्रवाशांना कभी खुशी कभी गम असे होत आहे.बावी येथील पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करून नागरिकांची अडचण दूर करावी अशी विनंती प्रशासनाला सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी केली आहे.





**शागीर्द अहमद शेख(सर) नुकतेच वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या निमित्त शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देताना. हाजी हाफीज खान साहेब, बाबा हाजी हाफिज खान पठाण...(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

संपादकीय

# माथ्यावर तळपे ऊन...



लोकनेता न्यूज नेटवर्क

राजधानी दिल्ली आणि आसपासचा परिसर सध्या वाढत्या उष्म्याने होरपळतो आहे. सारे लोकजीवन स्तब्ध करणारा इतका तडाखा का बसतो आहे, याचा खोलात जाऊन विचार करायला हवा.

ॲमेझॉन समर सेल आजपासून सुरु, अधिकतर वस्तूंवर होईल मोठी बचत त सूट एखाद्या भट्टीसारखी तापलेली राजधानी दिल्ली आणि बहुतांश उत्तर भारतात सध्या उन्हाळ्याच्या लाटेची तीव्रता माणसाच्या शरीराला सहन होणार नाही, इतकी आहे. सकाळी सातपासून उन्हाचे चटके बसू लागतात आणि सूर्यास्तानंतरही हवेतील उष्मा व धग कायम राहते. सकाळी दहापासून अनेक रस्ते ओस पडतात. गेला आठवडाभर दिल्लीत बहुतांश ठिकाणी ४५ अंश सेल्सिअस व त्यापुढील तापमानाची नोंद झाली. मागच्या वर्षी उन्हाळ्याची इतकी तीव्र लाट नव्हती. यंदाचा उन्हाळा मात्र दिल्लीकरांची परीक्षाच घेत आहे. दिल्लीतही बिहारप्रमाणे उष्माघाताने प्राण जात आहेत. अर्थात, यंदा अनेक राज्यांत तापमान ५० अंश सेल्सिअस व त्यापेक्षा वर गेले आहे. गेल्या वर्षी वातावरणातील बदलामुळे पृथ्वीवर सरासरी २६ दिवस जास्त उष्णतेची लाट राहिली, असे अभ्यासात दिसले.

भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) म्हणण्यानुसार, राजस्थान आणि हरयाणातून कोरडे आणि उष्ण वारे दिल्लीपर्यंत पोहोचत आहेत; त्यामुळे तापमान चढे आहे. वायव्य भारत, विशेषतः दिल्ली गेल्या एक-दोन आठवड्यांपासून भयंकर उष्णतेने होरपळत आहे. कमाल तापमान सरासरीपेक्षा आठ सेल्सियस अंशांनी जास्त आहे. केवळ लहान मुले व ज्येष्ठच नव्हे, तर तरुणांनाही यंदाचा उन्हाळा तापदायक ठरत आहे. उष्माघाताच्या रुग्णांची संख्या शेकड्यांच्या घरात पोहचली आहे. रुग्णालये रुग्णांनी भरून जात आहेत.

उष्णतेचे बेट बनलेली दिल्ली सर्व बाजूंनी लँडलॉक्ड आहे. दिल्लीच्या चारही बाजूंना सर्व दिशांनी फक्त जमीन आहे. पाकिस्तानची उष्णता, राजस्थानचे वाळवंट आणि हिमालय यांच्या मधला खोलगट भूभाग म्हणजे दिल्ली. साहजिकच या साऱ्या प्रदेशांतील हवामान बदल थेट दिल्लीत पोहोचतात. आयआयटी भुवनेश्वरच्या संशोधनात असे आढळले, की बेबंद शहरीकरणामुळे १४०पेक्षा अधिक शहरे त्यांच्या आसपासच्या निमशहरी, ग्रामीण भागांपेक्षा रात्री ६० टक्के जास्त उष्ण असतात. शहरीकरणाचा सर्वांत मोठा दुष्परिणाम झालेली शहरे म्हणजे अहमदाबाद, जयपूर, राजकोट, दिल्ली-एनसीआर आणि पुणे. केवळ प्रचंड ऊन आहे असे नव्हे, तर 'लू' म्हणजे चटका देणारा वारा हाही उत्तर भारतातील उन्हाळ्यातला तापदायक प्रकार. माणसाला रेल्वे लागते, विमान लागते तशी उत्तर भारतात 'लू' लागते. आर्द्रता, तापमान, वायूचा दाब हे घटक असणाऱ्या हवामानाचा स्पर्श माणसाला होतो, तो वाऱ्याच्या रूपाने. दिल्लीत राजस्थानकडून उष्ण वाऱ्याचे झोत येतात व ही 'लू' चटका देते. साध्या वाऱ्याची झुळूक असते तशा अतिउष्ण वाऱ्याच्या झळाही लागतात. त्याला 'लू' म्हणतात. पण या 'लू' ला तोंड देण्याचे उपाय आहे. टोपीची कॅप झाली तरी आता ती कोणी घालत नाही. घरातून बाहेर पडताना ग्लासभर ताक किंवा लस्सी पिऊन बाहेर पडावे, हाही एक उपाय; पण तो किती जण करतात?

तज्ज्ञांच्या मते माणूस निसर्गाकडून आपल्या सोयीनुसार वागण्याची अपेक्षा करतो आहे. पाऊस कधी यावा, उन्हाळा कधी असावा, हे माणूसच कसे ठरवतो? राजधानी दिल्ली सातत्याने वाढत आहे. ल्युटियन्स दिल्लीत तगवलेली व जगवलेली हिरवळ सोडली तर दिल्लीभर सगळीकडे काँक्रीटची जंगले अनिर्बंध वाढत आहेत. नियम पायदळी तुडवून सुरू असलेल्या बांधकामांमुळे वातावरणावरही विपरीत परिणाम होत आहे. उष्णतेच्या लाटेचे दुसरे सर्वांत मोठे कारण म्हणजे वातानुकूलन यंत्रांचा (एसी) अतिवापर. त्यामुळे पारा आणखी वर जातो. कूलरही नव्हते तेव्हा लोक घरात पाणी टाकून राहायचे. आता शाळा, शाळांच्या बस, घरे, कार्यालये सारेच एसी झाले आहे. एसीमधून उष्णता बाहेर फेकली जाते. ते घराच्या आतील भाग थंड करतात; पण आसपासचे वातावरण तापवतात.सन १८७५ मध्ये आयएमडी स्थापन झाली तेव्हा विशिष्ट झोपड्या उभारून, त्यात थर्मामीटर टांगून तापमान नोंदवले जाई. स्टीव्हन्सन्स स्क्रीन नावाचे उपकरण आले. आता अत्याधुनिक तापमान केंद्रांत डिजिटल सेन्सरच्या मदतीने संगणकीय नोंदी ठेवल्या जातात. हे सारे बदल झाले तरीही तापमान मापनात मानवी पैलू दुर्लक्षित आहेच. दिल्लीत सफदरजंग, लोधी रोड व पालम ही मूळची तीनच हवामान मापन केंद्रे. त्यांची संख्या १०वर गेली आहे. यंदा दिल्लीच्या ज्या मुंगेशपूरमधील नोंदीनुसार उष्णतेने ८० वर्षांचा विक्रम मोडला असे मथळे सजले तोच निष्कर्ष आयएमडीने पुढच्या २४ तासांत बदलला. जेव्हा तापमानाच्या नोंदी सरकारी केंद्रांतून त्यांच्या मुख्यालयांच्या आधी वाहिन्यांकडे पोहोचतात तेव्हा अशी गडबड होत असावी. तज्ज्ञ सांगतात, की आकड्यांच्या प्रेमात पडून दिल्ली होरपळली, असे मथळे करताना तापमान मापनाचे निकष काटेकोरपणे पाळले जातात की नाही, हे कोण तपासणार? दिल्लीत ८० वर्षांपूर्वी काय स्थिती होती, त्याची खातरजमा विक्रमी तापमानाच्या बातम्या देणाऱ्या कितीजणांनी करून घेतली असेल, हाही मुद्दा आहेच. अर्थात ती केली तरी सामान्यांच्या हिशेबी सध्या सुरू असलेला अग्निकोप सुरू राहणार आहेच!

# पंकजा मुंडे यांच्याबाबत समाज माध्यमात आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यावरून पाथर्डीत कडकडीत बंद





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहिल्यानगर । प्रतिनिधी

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत समाज माध्यमात आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यावरून अहमदनगरच्या पाथर्डी तालुक्यातील शिरापूर येथे तणाव निर्माण झाला होता. या प्रकाराच्या निषेधार्थ (शुक्रवारी) सकल ओबीसी समाज आणि सकल वंजारी समाजाच्या वतीने पाथर्डी बंदची हाक देण्यात आली होती. त्यास पाथर्डीकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. शहरातील सर्व दुकानदारांनी तसेच छोट्या व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभाग नोंदविला आहे.

अहमदनगरच्या पाथर्डी तालुक्यातील शिरापूर येथील एका युवकाने भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत आक्षेपार्ह स्टेटस ठेवले. या प्रकारानंतर तणाव निर्माण झाला. पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी संबंधित युवकावर गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली.मुंडे समर्थक शिरापूर येथील संबंधित तरुणाच्या घरावर जाब विचारण्यासाठी काल गेले होते. याची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत प्रकरणावर कायदेशिर कारवाईची हमी दिली. त्यानंतर संबंधित घटना पाथर्डी पोलिसांनी अत्यंत गांभीर्याने घेत आचारसंहिता भंग आणि स्टेटस ठेवून सामाजिक अशांतता निर्माण केल्याप्रकरणी युवकावर गुन्हा दाखल केला. या प्रकाराचा निषेध म्हणून आज दि.०७ रोजी पार्थडीत बंद पाळण्यात आला आहे.

# महायुतीबाबत चुकीचा संदेश जाऊ नये यासाठी भुजबळांसारख्या नेत्याने जाहीर वक्तव्ये टाळवीत

## भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकर यांचा सल्ला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

काल राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची बैठक पार पडली. या बैठकीत छगन भुजबळ यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपने आमच्या पक्षाला जास्त जागा देण्याचा शब्द दिला होता असे विधान केले होते. त्यांच्या या विधानावर बोलताना भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महायुतीबाबत चुकीचा संदेश जाऊ नये यासाठी छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारची जाहीर वक्तव्ये टाळायला हवीत, असा सल्ला दिला आहे.

पत्रकारांशी बोलताना दरेकर म्हणाले की, छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य टाळायला हवे होते. पक्ष चालवत असताना कार्यकर्त्यांना हिंमत देणे, मनोबल वाढवणे हेही तितकेच महत्वाचे असते. त्या उद्देशाने जास्तीचा वाटा आपल्याला मिळाला पाहिजे अशा प्रकारचे वक्तव्य भुजबळांचे असावे. जसे त्यांना वाटते जास्त वाटा पाहिजे मग भाजपाचे १०५ आमदार आहेत त्यांनी १०५ च्या खाली येऊन पुढे जायचे का? त्यांना जसे वाटते तसे प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला, नेत्याला वाटते. त्यातून असणारी प्रचलित स्थिती, प्रत्येकाचे स्थान या सर्व गोष्टींचे अवलोकन करून निर्णय घ्यायचा असतो. त्यांच्या असणाऱ्या जागांपेक्षा वाढीव जागा पाहिजेत मग भाजपाला १०५ च्या वर नकोत का? अशा प्रकारे समन्वयातून संतुलन साधूनच महायुतीत निर्णय होईल आणि देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले आहे की, भाजपा मोठा पक्ष आहे. तुलनात्मक जागा मोठ्या प्रमाणावर भाजपाला असतील. सहयोगी पक्षांचे कुठेही अवमुल्यन होणार नाही याची काळजी घेऊन त्यांचाही सन्मान केला जाईल. दरेकर पुढे म्हणाले की, प्रत्येक पक्षाला, कार्यकर्त्याला, नेत्याला आपली भुमिका मांडण्याचा अधिकार आहे. आमचाही मोठा पक्ष आहे, कार्यकर्ते आहेत असे असताना कुणीही बोलायचे आणि आम्ही गप्प बसायचे, आमच्याकडे बूथ स्तरापर्यंत अपार कष्ट घेणारा कार्यकर्ता आहे तो जर नाराज झाला तर पक्षाची गती, वाटचाल यावर परिणाम होतो. आमच्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्याची भूमिकाही तेवढीच महत्वाची आहे. त्याचबरोबर ४०० पार हा आमचा मुद्दा होता. तो मुद्दा समजविण्यात आम्ही कमी पडलो नाही.

# अंतराळातील कचऱ्याचा निचरा

लोकनेता न्यूज नेटवर्क



अंतराळयानांमुळे होणारा कचरा हा मोठा प्रश्न आहे. यामुळे भविष्यातील मोहिमांना आणि पर्यायाने आपल्यालाही अनेक धोके आहेत. हा कचरा काढून टाकण्याचे काम जिकीरीचे आहे. 'नासा'च्या ऑफिस ऑफ टेक्नॉलॉजी, पॉलिसी आणि स्ट्रॅटेजीने नुकतेच याबाबतच्या नव्या माहितीचे विश्लेषण करून त्यासाठी काही कमी खर्चाचे पर्याय सुचवले आहेत.पृथ्वीच्या कक्षेतील वाढत्या उपग्रहांच्या मदतीने पृथ्वीवरून होणाऱ्या संप्रेषणापासून ते बदलत्या हवामानापर्यंत अनेक बाबींविषयीचे ज्ञान मिळत असते. परंतु वाढता कचरा त्यात अडथळा आणू शकतात. सन २०२३मध्ये या संदर्भातील अभ्यास अहवालाचा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. यात कक्षीय कचऱ्यासाठी अंतराळयान किंवा उपग्रहाला वेगळी दिशा देणे, किंवा जुने उपग्रह पुन्हा वापरणे यासह कक्षीय उपायांचे विश्लेषण मांडले होते. नवीन अहवाल हा याचा दुसरा टप्पा असून, यात जोखमीचे अंदाज अधिक अद्ययावत आहेत. हे नवीन अंदाज अंतराळातील सर्वांत मोठ्या कचरासाठ्यापासून ते काही मिलिमीटर आकाराच्या तुकड्यांपर्यंत सर्व अवकाशीय वस्तूंची दखल घेतात.नवीन अहवाल कक्षीय कचऱ्याऐवजी अंतराळातील कचऱ्यामुळे उद्भवलेल्या जोखमीचा थेट अंदाज घेतो. कचरा टाळून अंतराळयानाला वाचवण्याच्या प्रक्रियेत येणारा खर्च किंवा त्याच्या जवळून न जाण्यासाठी लागणारा खर्च (मार्गबदल) आणि कचरा आदळल्याने होणारे नुकसान भरून काढण्यासाठी होणारा खर्च कमी करण्याकडे यात लक्ष दिले आहे.अभ्यासामध्ये कक्षीय कचऱ्याची जोखीम कमी करण्यासाठी किफायतशीर युक्त्या मांडल्या आहेत. एक म्हणजे मोठ्या प्रमाणातील कचऱ्याचा मागोवा घेत त्यानुसार नियोजन करणे. दुसरा भाग म्हणजे लहान आकाराच्या कचरासाठ्यापासून एक ते पाच सेंटीमीटरपर्यंत संरक्षण कवच तयार करणे किंवा काही कचरा जाळून नष्ट करणे, मोठ्या आकाराचा कचरासाठा हलवणे किंवा काहींचा पुनर्वापर करणे. निकामी अंतराळयानाला कक्षेमधून काढून टाकणे ही जोखीम कमी करण्याची किफायतशीर पद्धत आहे. मात्र, आणखीही सोप्या, कमी खर्चिक पद्धती शोधण्याचे काम चालूच आहे.

# खारफुटी वाचविण्यासाठी...

लोकनेता न्यूज नेटवर्क



खारफुटीसमोर असलेल्या धोक्यांमध्ये हवामान बदल हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. जगातील ३३ टक्के म्हणजेच एक तृतीयांश खारफुटी परिसंस्थांना हवामान बदलामुळे धोका असल्याचे या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे.किनारी भागाच्या रक्षणासाठी खारफुटी हा महत्त्वाचा घटक आहे. मात्र अलीकडच्या काही वर्षांत खारफुटी क्षेत्रावर विविध कारणांमुळे घाला आला आहे. जगभरातील निम्म्याहून अधिक खारफुटी परिसंस्था नष्ट होण्याचा धोका असून पाचपैकी एका खारफुटीसमोर तर अस्तित्वाचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे, असे गंभीर निष्कर्ष इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचरच्या (आययूसीएन) रेड लिस्ट ऑफ इकोसिस्टिमच्या निकषांनुसार केलेल्या अभ्यासात मांडण्यात आले आहेत.खारफुटीसमोर असलेल्या धोक्यांमध्ये हवामान बदल हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. जगातील ३३ टक्के म्हणजेच एक तृतीयांश खारफुटी परिसंस्थांना हवामान बदलामुळे धोका असल्याचे या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे. जंगलतोड, विकास, प्रदूषण आणि धरणांची बांधकामे या कारणांमुळे खारफुटीसमोर धोका निर्माण झाला आहे. मात्र, हवामान बदलाच्या परिणामी सागराच्या पातळीत वाढ आणि शक्तिशाली चक्रीवादळांची वाढती वारंवारता यामुळे खारफुटीला असलेला धोका वाढत आहे. यासाठी जगभरातील खारफुटी क्षेत्राटे ३६ विभागांमध्ये वर्गीकरण करून अभ्यास करण्यात आला. या अभ्यासांती, पुढील ५० वर्षांत जगभरातील एक तृतीयांश खारफुटी विभागांची हानी होईल, तर २५ टक्के क्षेत्र बुडिताखाली येईल, असा अंदाज यात वर्तवण्यात आला आहे. यात हिंदी महासागराच्या उत्तरेकडील खारफुटीसह वायव्य अटलांटिक, तांबडा समुद्र, दक्षिण चीन समुद्र आणि एडनचे आखात यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.जगभरातील खारफुटीमध्ये ११ अब्ज टन कार्बन साठा आहे. तेवढ्याच क्षेत्रावरील विषुववृत्तीय वनांच्या तुलनेत हे प्रमाण जवळजवळ तिप्पट आहे. हवामान बदल आणि सागर पातळीतील वाढीमुळे सन २०५०पर्यंत खारफुटीमध्ये साठवलेला १.८ अब्ज टन, म्हणजेच १६ टक्के कार्बन उत्सर्जित होऊ शकतो, असा अंदाज या अभ्यासाने वर्तवला आहे. आययूसीएनच्या नेतृत्वाखाली झालेल्या या अभ्यासात ४४ देशांमधील २५० तज्ज्ञांनी भाग घेतला. खारफुटींचे क्षेत्र हे लाखो संवेदनशील समुदायांचा अधिवास आहे. किनारी आपत्तींचा धोका कमी करणे, कार्बन साठा आणि मच्छिमारीला साह्य यादृष्टीने खरफुटीचे मोल मोठे आहे. त्यामुळे खारफुटींचा ऱ्हास हा निसर्ग आणि लोकसंख्या दोन्हींसाठी हानिकारक ठरू शकतो. याआधीच गमावलेली खारफुटी पुनरुज्जीवित करण्याच्या तसेच बचावलेल्या क्षेत्राचे संवर्धन करण्याच्या प्रयत्नांना या अहवालाने दिशा मिळू शकेल, असे मत आययूसीएनच्या महासंचालक ग्रेथेल अग्विलर यांनी व्यक्त केले.

# पवनचक्की कोसळण्याच्या घटनेनंतर महाजनवाडीकर दहशतीखाली;रास्तारोकोचा इशारा-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**





बीड तालुक्यातील बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराला वैतागलेले महाजनवाडीकर काल गुरूवार रोजी गेवराई तालुक्यातील गोविंदवाडी शिवारातील पालख्या डोंगराजवळील टेंभी ताडा येथील पवनचक्की कोसळल्याने दहशतीखाली असुन महाजनवाडी येथील पवनचक्की प्रकल्पाच्या अपघात प्रवण क्षेत्रात असलेल्या ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व न्यायालयात दाद मागितल्यानंतर अखेर रस्त्यावर उतरून लढाई करण्याचे ठरवले असुन लवकरच रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.

महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६,४९७,४२१व ५०१ मध्ये वडिलोपार्जित समाईक असलेली जमीन कुटुंबातील ६ व्यक्तींच्या नावावर असुन या समाईक क्षेत्राचे महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर शेतजमिनीचे आपसांत तंतोतंत आजतागायत वाटप झालेले नाही.पवन उर्जा कंपनीने जमिनीच्या ६ मालकांपैकी केवळ दोघांच्या संमतीने सहा एकर जमिन १८ वर्षे ११महिन्यांसाठी भाडे तत्वावर दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे नोंदणी करून घेतली आहे. ईतर ४ जमिन मालकांना याची कल्पनाही नाही.संबधित प्रकरणात जिल्हा बीड आणि न्यायालयात दावा दाखल केला असुन कंपनीला नोटीस पाठवली आहे.नियमानुसार २३० मिटर अंतरामध्ये कच्चे अथवा पक्के घर म्हणजे रहिवास नसावा ही अट असताना १०० मिटरवर लोकवस्ती आहे.विशेष म्हणजे पवनचक्की प्रकल्पाची जागा अगोदर मोजणी करताना दुसरीच होती.मात्र नंतर लोकवस्ती मध्ये प्रकल्प उभारण्यात आला आहे.पवनचक्की पासुन आमचं राहतं पक्कं सिमेटचं घर आणि कोठा १०० मीटर अंतरावर असुन काल गेवराई येथील पवनचक्की कोसळल्यानंतर आम्हाला आमच्या व जनावरांच्या जिवाची जास्त भिती वाटु लागली असुन हा प्रकल्प दुसरीकडे हलवावा.अशी मागणी शारदा घरत यांनी केली आहे.बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून अज्ञानी शेतकऱ्यांची दिशाभूल आणि आर्थिक लुबाडणूक होत असून जिल्हा प्रशासनाला लेखी तक्रारी नंतर सुध्दा शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी महसूल आणि पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत पुढा-यांच्या सांगण्यावरून पिडीत शेतकऱ्यांना धमकावण्याचे प्रकार घडत असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात लवकरच मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर महाजनवाडी फाट्यावर रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.

## पावसाचे आगमन: रोहिणीची तालुक्यात दमदार सुरुवात, बळीराजा सुखावला



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यात गुरुवारी विजांच्या कडकडाटासह रोहिणी नक्षत्राचा मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाड कोलमडून पडले तर विजेचे खांब तुटुन पडले त्यामुळे काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता. कडा,शेरी बु खाकळवाडी, सांगवी, पाटण, डोईठण,बावी,कापशी,किन्हीं, धामणगाव, देवळाली,घाटा पिंपरी या परिसरात मध्यम व हलका पाऊस झाला. सलग तीन दिवस पाऊस पडल्यामुळे नाले तुडुंब भरले आहेत,ओढे नाले वाहू लागले आहेत, शेतीमध्ये सगळीकडे पाणीच पाणी साचलेले दिसत होते. त्यामुळे शेतकरी पेरणीच्या कामाला लागल्याचे दिसून येत आहे, या पावसामुळे शेतकरी व पशूपालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे, तासभर झालेल्या पाऊसाने आष्टी तालुक्यातील बहुतांश गावाला चांगलेच झोडपून काढले. दुपारपर्यंत उकाडा जाणवत होता, त्यानंतर वातावरणात बदल होऊन सायंकाळी साडेसात वाजता विजेच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. अचानकपणे सुरू झालेल्या पाऊसाने अनेकांची तारांबळ उडाली असली तरी रोहिणी नक्षत्र बरसल्याने खरीप हंगामातील पेरणीला पोषक वातावरण निर्माण झाल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करीत आहे.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे-प्रमोद मोरे





लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

राळेगणसिद्धी येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित पर्यावरण मेळाव्यात निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद मोरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी वनाधिकारी श्री प्रभाकर म्हस्के होते.यावेळी बोलताना प्रमोद मोरे म्हणाले की स्वर्गीय आबासाहेब मोरे व ज्येष्ठ समाजसेवक डॉ अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था कार्यरत असून आज राज्यभर या संस्थेचे भरीव काम सुरू आहे.वृक्षारोपण व त्याचे संगोपन व पर्यावरण पूरक उपक्रम राबवत ही संस्था राबवत असते.विशेष म्हणजे या संस्थेमध्ये शिक्षकांची संख्या जास्त असल्याने ही संस्था विद्यार्थी शिक्षक हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या माध्यमातून काम करत आहे.ही संस्था नेहमीच पर्यावरण संमेलने आयोजित करत असते.सध्याचे वाढते तापमान,कमी झालेले आयुर्मान व पर्यावरणाच्या समस्या भेडसावताना दिसत आहे. प्रत्येकानेच आपले आद्य कर्तव्य म्हणून पर्यावरण पूरक उपक्रम राबवले पाहिजे.यावेळी श्री चंद्रकांत शिंदे,श्री विलास महाडिक,श्री मोहन क्षिरसागर, वनश्रीताई मोरे,छायाताई राजपूत,संतोष परदेशी,सुभाष वाखारे,मारूती कदम,तुकाराम अडसूळ,लतिका पवार,अनिल लोखंडे,रविंद्र पवार,उत्तम पवार, अण्णासाहेब साबळे चंद्रकांत भोजने,सुहास गावीत,अमोल चंदनशिवे,संजय कारखिले,सुनिल कार्ले, वैभव मोरे,कोमल मोरे,मिनाक्षी मोरे,इ.मा मान्यवर उपस्थित होते वेगवेगळ्या जिल्ह्यातून अनेक प्रतिनिधी यावेळी उपस्थित झाले होते.पर्यावरणासाठी काम करण्याला राळेगण सिद्धी येथे आल्यावर आण्णा हजारे यांच्याकडून ऊर्जा मिळते असे पर्यावरण प्रेमी यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धीरज वाटेकर यांनी केले.तर आभार श्री ज्ञानेश्वर क-हाळे यांनी मानले

## ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या विजयात ठरले आ.कैलास पाटील किंग मेकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव । प्रतिनिधी**




धाराशिव लोकसभा मतदारसंघातून सलग दुसर्यांदा विजयी झालेले लोकप्रिय खासदार ओमप्रकाश (दादा) राजेनिंबाळकर यांच्या देदिप्यमान यशामध्ये धाराशिव-कळंब लोकसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख कैलास (दादा) पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघात असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघापैकी एकमेव धाराशिव-कळंब विधानसभा विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे आ.कैलास (दादा) पाटील यांनी खिंड लढवून लोकसभेत ओमप्रकाश (दादा) राजेनिंबाळकर यांना पुन्हा लोकसभेत संधी दिली. त्यामुळे आ.कैलास (दादा) पाटील हेच किंगमेकर ठरल्याचे बॅनर धाराशिव शहरात झळकत आहेत.

धाराशिव शहरातील महात्मा बसवेश्वर चौक, छत्रपती शाहुनगर, अष्टविनायक चौक व इतर भागात किंगमेकर कैलास (दादा) पाटील अशा आशयाचे बॅनर लावण्यात आलेले आहेत. याबाबत बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर संघटक प्रशांत (बापू) साळुंके म्हणाले की, धाराशिव लोकसभा मतदारसंघात बार्शी, परंडा-भूम-वाशी, तुळजापूर, उमरगा, औसा या विधानसभा मतदारसंघातील आमदार हे महायुतीत आहेत, आणि धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार कैलास (दादा) पाटील हे एकमेव आमदार आहेत. त्यांनी संपूर्ण लोकसभा मतदारसंघाची खिंड लढवून विरोधी उमेदवारांना गारद केले. म्हणून कैलास (दादा) पाटील हेच या लोकसभा निवडणुकीत जायंट किलर ठरल्याची प्रतिक्रिया श्री.साळुंके यांनी दिली.

## जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते रास्तभाव

### दुकानदारांना नविन ई-पॉस मशिनचे वितरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव । प्रतिनिधी**



सन २०१७ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य वाटपासाठी वापरात असलेले ई-पॉस मशिनची मुदत संपुष्टात आल्याने आज ६ जून रोजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांचे हस्ते त्याच्या कक्षात १० रास्तभाव दुकानदार यांना प्राधिनिधीक स्वरुपात नवीन ई-पॉस मशिन आणि आयआरआयएस स्कॅनरचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.


जिल्हयात एकुण १०७८ रास्तभाव दुकाने आहेत.जिल्हयातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये नविन ई-पॉस मशिन बसविण्याकरिता सिस्टम इटेग्रेटर कंपनीची निवड करण्यात आली असून त्याच्यामार्फत रास्तभाव दुकानदारांसाठी ८ ते १३ जून-२०२४ दरम्यान तालुकानिहाय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे.नविन ई-पॉस मशिनमध्ये आयआरआयएस स्कॅनर व फोर जी ची सुविधा दोन सीमकार्डसह देण्यात येणार आहे.तसेच हाताच्या बोटाचे ठसे उमटत नसतील तर ओटीपी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.यामुळे यापुर्वी जुन्या ई-पॉस मशिनला नेटवर्कच्या येत असलेल्या अडचणी दुर होण्यास मदत होणार आहे.तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सर्व योजनेच्या लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानदारांकडुन धान्याची उचल करतेवेळी ई-केवायसी व मोबाईल सिडींग पुर्ण करून घ्यावे.असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## भरधाव वेगात सुटलेली चिंतामणी लक्झरी पलटली,सावखेड तेजन फाट्याजवळील घटना;१७ प्रवासी किरकोळ जखमी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

पुणे येथून नागपूरकडे भरधाव वेगाने जाणारी चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे ट्रॅव्हल्स पलटी झाल्याची घटना दि ७ जूनच्या सकाळी ५ वा ३० मि घडली, सदर चिंतामणी ट्रॅव्हल्स क्र . एपी ०६ ए ९७४२ या क्रमांकाच्या ट्रॅव्हल्स असून रवी रामचरण राठोड वय ३८ वर्षे रा .रेवणसिद्ध तांडा तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली व दुसरा चालक अमोल ज्ञानदेव सातोरे कसुरा तालुका बाळापूर जिल्हा अकोला हे आळीपाळीने ट्रॅव्हल्स चालवायचे ,सदर सावखेड तेजन फाट्यावर सदर चालकाला डूलकी आल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले व ट्रॅव्हल्स पलटी झाली सुदैवाने ट्रॅव्हल्स मधील ३४ पैकी १७ प्रवाशांना किरकोळ मार लागल्यामुळे ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे त्यांना उपचारासाठी भरती करण्यात आले ,सुदैवाने यामध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही,तर उर्वरित १७ जण सुखरूप आहे,जखमी मध्ये योगेश गणेश शेंदुरकर राहणार कोठारी तालुका मंगरूळपीर जिल्हा वाशिम,दिनेश मधुकर राठोड राहणार पिंपळखुटा तालुका दारवा जिल्हा यवतमाळ, संदीप बाबू सिंग राठोड राहणार पिंपळगाव तालुका दारवा जिल्हा यवतमाळ,प्रीतम संतोष पडघान, राहणार आडोळी तालुका जिल्हा , वाशिम ,अंकुश प्रल्हाद पोहाणे राहणार कवठळ तालुका मंगरूळ बीड जिल्हा वाशिम,सुनील मोहन पवार राहणार वार्डाखेर्डा तालुका मानोरा जिल्हा वाशिम,वैष्णवी पुरुषोत्तम अंभोरे राहणार सावरखेड तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला,उज्वल पुरुषोत्तम अंभोरे राहणार सावखेड तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला,सौरव विजय कोल्हे राहणार शिवणे तालुका पुसद जिल्हा यवतमाळ,सुरेश मानसिंग जाधव भोईनी तालुका मानोरा जिल्हा वाशिम,स्वराज राम राठोड राहणार सावरगाव तालुका मानोरा जिल्हा वाशिम,सदाशिव विष्णू निकष राहणार सावत्रा तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा, प्रतीक्षा सदाशिव निकष राहणार सावत्रा तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा,सरस्वती गजानन गायकवाड राहणार वाशिम,मिनाबाई भारत कांबळे राहणार वाशिम,अविनाश भीमराव मोरे राहणार शहापूर जिल्हा वाशिम,दिपाली अविनाश मोरे राहणार शहापूर जिल्हा वाशिम अशी किरकोळ जखमी झालेल्या प्रवाशांची नावे असून सदर प्रवासी हे बुलढाणा यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील आहेत,यावेळी घटनास्थळी ग्रामस्थांनी व पोलिसांनी तातडीने धाव घेऊन प्रवाशांना गाडीतून बाहेर काढले.



# दूषित पाणी देऊन मानव अधिकाराचे उल्लंघन न.प. मुख्याधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करा-डॉ.बशीरे







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार ६ लोणार नगरिषदेच्या मुख्याधिकारी नगरवासीयांना नळ योजनेद्वारे दूषित,दुर्गंधीयुक्त पाणी पिण्यास देऊन मानवाधिकाराचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी विभागीय आयुक्त, निधी पांडे यांच्याकडे शिवसेना उ.बा.ठा. चे जिल्हा संघटक प्रा. डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे), यांनी केली.

नगरपरिषद लोणार येथील मुख्यधिकारी यांनी शहरास पिन्या जोगे स्वच्छ पाणी किमान आठवड्यातून एकदा देण्यात यावे या करिता डॉ.गोपाल बशिरे यांनी अनेक वेळा विनंत्या केल्या, निवेदने दिले, गजानन जाधव यांनी मे २०२३ मध्ये आमरण उपोषणे केले तेव्हा मुख्याधिकारी यांनी लेखी आश्वासन देऊन १० दिवसातून एकवेळा स्वच्छ व फिल्टर पाणीपुरवठा करूत असे लेखी आश्वासन देऊन सुद्धा मुख्याधिकारी यांनी जाणून बुजून किंवा त्यांना या विषयाचे गांभीर्य नसल्या कारणाने त्यांनी रीतसर या पाणी प्रकरणाकडे डोळे झाक केलेली आहे आणि त्यांच्या या कृतीमुळे पिवळ्या रंगाचे,दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी कोणत्याही प्रकारचे फिल्टर न करता जसेच्या तसे धरणातून पाण्याच्या टाकीत व पाण्याच्या टाकीतून नळाला २० ते ३० दिवसातून एक वेळा शहरास नळ योजनेमार्फत सोडण्यात येत आहे जेव्हकी दि. १२ डिसेंबर २०२३ला न.प. ने पाठविलेले पाण्याचे नमुने अहवाल क्र.५७७९-८ दि.१७/१/२०२४ नुसार सदरील पाणी पिण्यास अयोग्य आहे असे मुख्य अणूजीव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा बुलढाणा यांनी कळवले होते यांनी कळविले होते परंतु सदरील पाण्यावर कुठलीही प्रक्रिया न करता तसेच दूषित पाणी लोणार वाशीयांना पिण्यासाठी सोडतात

**लोणार येथील पाणी प्रश्न पेटला**

या कारणाने लोणार शहरातील शेकडो अल्पवयीन मुले वृद्ध हे डायरिया, पोटाचे विकार, व कावीळ सारख्या विकाराणे ग्रस्त झाले आहेत व यास कारणीभूत नगरपरिषद लोणारच्या मुख्याधिकारी ह्या आहेत त्यांनी जाणून बुजून सर्वसामान्य जनतेस पिवळ्या रंगाचे दूषित, दुर्गंधीयुक्त पाणी पिण्यासाठी देऊन संविधान अनुच्छेद२१म्हणजेच स्वच्छ पाण्याच्या संदर्भात मूलभूत अधिकाराचे हनन करून हजारो सजीव माणसांच्या जीवनाशी खेळत आहेत. करिता नगरपालिका लोणार मुख्याधिकारी यांच्या विरोधात संविधान अनुच्छेद२१मधील पाण्याविषयीची मूलभूत अधिकाराचा उल्लंघन विरोधात व सर्वसामान्य हजारो लोकांना दूषित पाणी पिण्यासाठी देऊन त्यांच्या प्रानास धोका निर्माण करून त्यांच्या जीवाशी खेळण्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून नियमाने कार्यवाही करवी करिता फिर्याद मा निधी पांडे विभागीय आयुक्त यांच्याकडे एक तास चर्चा करून त्यांच्याकडे दाखल करण्यात आली त्यावर विभागीय आयुक्तांनी उपजिल्हाधिकारी श्री जोग यांना डॉ. गोपाल बशिरे यांच्यासमोर पाण्याचे नमुने घेऊन तपासणीस पाठवा असे आदेश दिले त्यानंतर कार्यवाही करूत जिल्हा उपाधिकारी जोग मुख्याधिकारी व यांच्यासमोर पोलीस स्टेशन समोरील भागातून नळातून येणाऱ्या पाण्याची नमुने घेतले व तेथील करून तपासणी बुलढाणा व संभाजीनगर या दोन ठिकाणी पाठवण्यात आले. याप्रसंगी बुलढाणा जील्हाऊपाधिकरी जोग, लोणार तहसीलदार गिरीश जोशी, लोणार न.पा. मुख्याधिकारी विभा वऱ्हाडे, व शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख गजानन जाधव, उपतालुका प्रमुख परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, राजू बुधवत, श्रीकांत मादनकर, लूकमान कुरेशी, इक्बाल कुरेशी, तानाजी अंभोरे, तानाजी मापारी, अश्रूबा धारकर, राजू दहातोंडे, गणेश पाठे हे उपस्थित होते.

## महाराष्ट्र विधानसभा संदर्भाने बि.आर.एस.पक्ष प्रमुखांशी चर्चा करणार-शंकर अण्णा धोंडगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शंकर अण्णा धोंडगे परिवाराच्या वतीने कंधार तालुक्यातील बाचोटी येथे होणाऱ्या परंपरागत रसाळी स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन दि.७ जून रोज शुक्रवारी करण्यात आले होते,



यावेळी शेतकरी नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे पुढे बोलतांना म्हणाले कि कंधार लोह्याचे राजकीय, सामाजिक दृष्ट्या आणि विकासाने गत दहा वर्षात मोठे नुकसान झाल्याची खंत शंकर अण्णा धोंडगे यांनी व्यक्त केले,महाराष्ट्रात आक्टोंबर महिण्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूका संबंधाने भारतराष्ट्र समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.के.चंद्रशेखरराव यांचे सोबत आठवड्याभरात चर्चा करुन पुढील धोरण ठरवण्यात येणार असल्याची माहिती धोंडगे यांनी सांगितले,दिड वर्षापुर्वी तेलंगणाचे तात्कालीन मुख्यमंत्री मा.के.चंद्रशेखरराव यांनी त्यांच्या दशकभराच्या काळात तेलंगणात केलेल्या विकास कामाचे मॉडेल घेवून मोठा गाजावाजा करीत महाराष्ट्रात नांदेड व लोहा येथे मोठ मोठ्या सभा घेवून महाराष्ट्रात आले.त्यांनी तेलंगणात केलेल्या वास्तविक व मुलभूत विकासाच्या मॉडेल व कृतीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी कष्टकरी,गोरगरीब जनतेसह सर्व सामाजिक घटक प्रभावीत व आकर्षित झाले.शेतकरी नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांचे सह अनेक मान्यवरांनी पुढाकार घेवून महाराष्ट्रात बि.आर.एस.ला असंख्य समर्थक मिळवून देवून पक्ष विस्ताराचे काम केले. महाराष्ट्रात पक्षाचे वीस लाख सभासदही झाले.

सध्या स्थितीत बि.आर.एस. च्या कार्यकर्त्यांची महाराष्ट्र विधानसभा लढवावी अशी इच्छा असल्याने त्याबाबत आठवडाभरात मा.शंकर अण्णा धोंडगे पक्ष प्रमुख मा.के.सि.आर.साहेबांसोबत चर्चा करुन पुढील धोरण निश्चित करण्यात येईल,त्यानंतर या महिन्या अखेर महाराष्ट्र राज्यातील कार्यकत्यांचा मेळावा घेवून पुढील वाटचाल निश्चित करणार असल्याचे धोंडगे यांनी सांगितले.

## संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स कार्यशाळा द्वयारे राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



शिदोड येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रा. मिथुन जोगदंड ( संविधानदुत ) यांचे संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते ज्याच्या मनगटात बळ, बुद्धी, चातुर्य आहे तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो हे विचार सांगणा-या राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त संध्याकाळी ८.०० वा अभिवादन करण्यात आले.

या ठिकाणी या कार्यक्रमासाठी निमंत्रक भाई आकाश निर्मळ , जेष्ठ नेत्या प्रा. सुशिला मोराळे, पांडुरंग शेंडगे,आयोजक भाई प्रा. दत्ता प्रभाळे,वाल्मिक कदम, गोविंद निर्मळ , प्रा.नितीन गायकवाड,अंकुश गवळी या मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे शिवसंग्राम संघटनेचे डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते पुजन करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कोकाटे ज्ञानेश्वर, नवनाथ प्रभाळे, मुकुंद गोरे, गंगाधर निर्मळ आदी मान्यवरांबरोबरच गावातील प्रतिष्ठीत नागरीक, युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाई दत्ता प्रभाळे व युवकांनी परिश्रम घेतले. प्रा.मिथुन जोगदंड हे संपूर्ण महाराष्ट्रभर गेल्या दोन वर्षांपासून संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स प्रदर्शनद्वारे संविधान जनजागृती अभियान राबविण्यात आहेत.प्रत्येक मूल्यांचे कॅलिग्राफी पोस्टर्स मार्फत संविधान समजते.दैनंदिन जीवनात आपण संविधानिक मुल्यांचा वापर करून आपण आपले जीवन आनंदमय सुखमय केले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या वतीने श्री.मोहन खवळे सरांचा सन्मान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आदर्श गाव राळेगण सिद्धी येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडाळाच्या वतीने निसर्ग प्रेमी कार्यकर्ता मेळावा व मंडळाचे संस्थापक अध्यक्ष वृक्षमित्र स्व . आबासाहेब मोरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी जामखेड तालुक्यातील सेवा निवृत्त आदर्श मुख्याध्यापक श्री.मोहन खवळे सर यांचा सन्मान निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या वतीने करण्यात आला .

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा . श्री . प्रभाकर म्हस्के ( सेवा निवृत्त सहाय्यक वनसंरक्षक वनविभाग पालघर),प्रमुख पाहुणे मा.श्री. चंद्रकांत शिंदे ( उप - प्रादेशिक अधिकारी महा.प्रदूषण नियंत्रण मंडळ अहमदनगर ), मंडळाचे राज्याचे अध्यक्ष मा . प्रमोद ( दादा ) मोरे, सचिव सौ . वनश्रीताई मोरे - गुणवरे,श्रीमती छायाताई राजपूत यांच्या हस्ते सेवानिवृत आदर्श मुख्याध्यापक व मंडाळाचे अहमदनगर जिल्हा उपाध्यक्ष श्री.मोहन खवळे यांचा सन्मान करण्यात आला.

मंडळाचे राज्य कार्याध्यक्ष श्री . उत्तम पवार,राज्य प्रसिद्धी प्रमुख श्री.आण्णासाहेब साबळे, मंडाळाचे जिल्हा कार्याध्यक्ष श्री. नानासाहेब मोरे,जिल्हा संघटक श्रीम.कामिनी राजगुरु व मंडळाचे सर्व राज्य पदाधिकारी , जिल्हा पदाधिकारी व निसर्गप्रेमी . सामाजिक क्षेत्रातील सर्व मान्यवर व शिक्षक मित्रानी श्री.खवळे सरांचे अभिनंदन केले .

## बी-बियाणे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या दुकानदारास कृषीमंत्री महोदय यांनी जिल्हा प्रशासनास आदेश देऊन शेतकऱ्यांची लुट थांबवा.- प्रा. दत्ता भाई प्रभाळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



अगोदरच दुष्काळाच्या फटक्याने उध्वस्त झालेला शेतकरी खरीप हंगामाची पेरणीची तयारी करीत असताना कापुस,सोयाबीन या पिकाला प्राधान्य देत आहे परंतु महाबीज बियाणांचे व्यापाऱ्यांनी कृत्रिम तुटवडा निर्माण केला आहे.तुलसी कंपनीची कब्बडी, ॲग्रो सिड्स कंपनीचे ७०६७ बियांणाची विक्री ८६४ रुपये किंमतीची बॅग ब्लक ने १२५० ते १३५० पेक्षा जास्त दराने बियाणे विक्री करून शेतकऱ्याची लूट सुरू केली जात आहे.सोयाबीन २२०० रु किंमतीची बॅग ३००० रु पर्यंत काळ्या बाजारात विक्री होत असताना. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे साहेब यांनी विशेष लक्ष वेधून जिल्हा प्रशासनास सुचना देऊन कृषी दुकानदारांचे स्टिंग ऑपरेशन करून ही लूट थांबवावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे प्रा. दत्ताभाई प्रभाळे यांनी केली आहे.

महागाई त्रस्त झालेल्या शेतकऱ्याला आस्मानी व सुलतानी या दोन्ही संकटाचा सामना करावा लागत आहे. मागील खरीप हंगामात बियाणे पेरले ते उगवलेच नाही, शासनाकडे तक्रार केली तर नुसते पंचनामे करून मोकळे होतात मात्र सरकार शेतकऱ्यांचे आर्थिक मदत मिळून देण्याकरिता दुर्लक्ष करते, या वर्षी वेळेवर पाऊस पडण्याची स्थिती निर्माण झाली परंतु कापुस बॅग, सोयाबीन बी- बियांणाचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे, तात्काळ शेतकऱ्यांची लूट थांबवावी अशी मागणी शेतकरीवर्ग करत असताना जिल्हा प्रशासनास झोपेचे सोंग घेवून कृषी दुकानदारांची पाठराखण करताना दिसत आहेत.शेतकऱ्यानी बी बियाणे खरेदीच्या पावत्या व गोण्या जपून ठेवाव्यात, याही वर्षी उगवण झाली नाहीतर सीड कंपन्याला जाब विचारावा लागेल ,संघटित होऊन शेतकऱ्यांनी स्वतः ही लुट होऊ देऊ नये असे युवक कॉंग्रेस जिल्हा सरचिटणीस प्रा. दत्ताभाई प्रभाळे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी विशाल वाघमारे यांची निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक मंडळाचे प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय अनारसे साहेब यांनी सामाजिक कार्याची आवड असणारे सामाजिक कार्यकर्ते, सहकार्य करणारे व्यक्तिमत्व व युवा नेतृत्व म्हणून बीड जिल्ह्यात अनेक युवकांना शैक्षणिक दृष्ट्या मदत करून शासकीय अनेक योजनांची माहिती समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन करून सर्व गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी सक्रिय असणारे श्री विशाल वाघमारे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी निवड घोषित केल्यानंतर मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री विष्णू वखरे व प्रदेश संघटक सुनीलराव पोकळे यांनी विशाल वाघमारे यांना नियुक्त पत्र दिले.यावेळी पत्रकार राम काशीद,सुरेश वखरे,नितीन क्षीरसागर उपसंपादक लोकप्रभा,युवा उद्योजक रवी सूर्यवंशी, संतोष काशीद, बापू झांबरे, अक्षय वाघमारे, अनंत शिंदे, प्रशांत झांबरे,प्रणव वाघमारे इत्यादी जणांची उपस्थिती होती.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904